Open Access

IJASSH

International Journal of Arts, Social Sciences and Humanities

(A Quarterly, Refereed, & Peer Reviewed International Journal)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://ijassh.aaassher.org/
ISSN (Online): 2584-1130
Volume 1, Issue 2, June 2023; Pages 01 – 07
DOI: 10.5281/zenodo.10223686

Original Research Article

# लातूर जिल्ह्यातील बोळेगाव या गावातील कुटुंबनियोजनाचा भौगोलिक अभ्यास

बिचकुंदे एस. एस.

संशोधक विद्यार्थी, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड ४३१६०६ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail:* shashikant.bichkunde@gmail.com

Received: 22 March, 2023 | Accepted: 06 May, 2023 | Published: 08 May, 2023

**प्रस्तावना**

भारतास कुटुंबनियोजनाची विशेष गरज आहे. सध्या भारताची लोकसंख्या प्रतिवर्षी २.५% इतक्या झपाट्याने वाढत आहे. जगाच्या एकूण क्षेत्रफळाच्या २.४% क्षेत्रफळ असलेल्या भारतास आज एकूण जागतिक लोकसंख्येच्या १६.८% लोकांस पोसावे लागत आहे.

राष्ट्राचा आर्थिक विकास झपाट्याने व्हावा, या उद्देशाने कुटुंबातील संततीच्या संख्येवर जाणूनबुजून घालण्यात येणारी मर्यादा. लोकसंख्यावाढीमुळे उद्‌भवणाऱ्या आर्थिक अडचणी टाळता याव्यात, म्हणून अशी मर्यादा घालण्याची आवश्यकता भासते. लोकसंख्येची वाढ पर्याप्त मर्यादेपलीकडे म्हणजेच अनियंत्रितपणे होत गेल्यास, ती राष्ट्राच्या आर्थिक विकासाच्या मार्गात अनेक अडथळे आणते आणि त्यामुळे जीवनमान सुधारणे कठीण होते; राष्ट्रीय उत्पन्नाची दरडोई वाढ फारच मंदगतीने होते.

अन्नधान्याचा पुरवठा अपुरा पडून त्याची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागते; लोकसंख्येतील अनुत्पादक वयोगटातील व्यक्तींचे व बेकारीचे प्रमाण वाढत जाते व बचतीमध्ये वाढ करून आर्थिक विकासास आवश्यक तेवढी भांडवल-संचिती करणेही जड जाते. म्हणूनच राष्ट्राचा आर्थिक विकास त्वरित होऊन सरासरी कौटुंबिक जीवनमान सुधारावे, ह्यासाठी लोकसंख्यावाढीवर कुटुंबनियोजनाद्वारे नियंत्रण घालण्याची गरज भासते. कुटुंबातील संततीची संख्या नियंत्रित करण्याबरोबरच दोन मुलांमध्ये योग्य अंतर ठेवणे, हेही कुटुंबनियोजनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

संततिनियमनास प्रथमतः बऱ्याच राष्ट्रांमध्ये शासकीय विरोध होता व त्याचा प्रचार करण्याविरुद्ध कायदेही संमत करण्यात आले होते. हळूहळू हा शासकीय विरोध कमी होत गेला. प्रचारासाठी शासनांची संमती मिळत गेली व नंतर

प्रचारामध्ये शासन स्वतः सहभागी होत गेले. स्वीडनच्या शासनानेच संततिनियमनाच्या प्रसारास प्रथम हातभार लावला व नगरपालिकांच्या संततिनियमन केंद्रांना आर्थिक मदत देऊ केली. इतर राष्ट्रांतील शासनांनीही संततिनियमनाच्या खाजगी संस्थांनी केलेल्या प्रयत्नास सहकार्य दिले. १९५० पासून भारतातही संततिनियमनाच्या प्रयत्नांना सरकारने मदत केली. १९४८ पासून जपानमध्ये गर्भपात कायदेशीर मानला जाऊ लागला व हळूहळू गर्भपाताचे प्रमाण कमी होत जाऊन अन्य मार्गां चा वापर अधिक प्रमाणावर होऊ लागला.

संततिनियमनाच्या विविध साधनांचा वापर फार प्राचीन काळापासून होत आला आहे. ख्रिस्तपूर्व १८५० ते १५५० या काळातील काही ईजिप्शियन लेखांतून व प्राचीन हिब्रू वाङ्मयातून गर्भधारणा टाळण्याच्या अनेक उपायांचा उल्लेख आढळतो. ख्रिस्तपूर्व चौथ्या शतकात ॲरिस्टॉटल याने गर्भाविरोधाच्या उपायांचे वर्णन केलेले आहे. त्याचप्रमाणे इ. स. दुसऱ्या शतकात सोरेनस या प्रसूतिशास्त्रवेत्त्याने संततिनियमनाच्या पद्धतीचे सविस्तर विवेचन करून गर्भपाताऐवजी गर्भधारणा टाळणे हा अधिक श्रेयस्कर मार्ग होय, यावर भर दिला. ग्रीक व रोमन काळांत स्त्रियांचे आरोग्य सुरक्षित राखण्याच्या दृष्टीने गर्भाविरोधास विशेष महत्त्व दिले जाई; परंतु गर्भसंभव टाळण्याच्या पद्धतींचा अवलंब फारच थोड्या नागरिकांना करता येत असे. गर्भाविरोधाच्या तंत्राचा सार्वजनिक प्रसार मात्र एकोणिसाव्या शतकापर्यंत झाला नव्हता.

**महत्वाचे शब्द:** लातूर जिल्हा, बोळेगाव, लोकसंख्या, हिंदू, मुस्लिम, बौद्ध, कुटुंब, प्राथमिक आरोग्य केंद्र, ऑरिस्टाटल, सोरेनस

### कुटुंब नियोजन कार्यक्रम

भारतात १९५२ साली म्हणजेच पहिल्या पंच'वार्षिक योजनेत कुटुंब नियोजन कार्यक्रमाची सुरवात झाली. तत्कालीन मुबई प्रातांत सण १९५७ पासून या कार्यक्रमाची सुरवात झाली. सण १९७१ पासून आजपर्यंत या कार्यक्रमात अनेक  घटकाची भर पडली. सण १९७८ साली कुटुंब नियोजन कार्क्रमाचे नाव "कुटुंब कल्याण कार्यक्रम" असे करण्यात आले. तर सण १९९७ सालापासून हा कार्यक्रम “प्रजनन आणि बालसंगोपन" या नावाने ओळखला जाऊ लागला. "हम दो, हमारे दो" हे या कार्यक्रमाचे हिंदी भाषेतील घोषवाक्य आहे.

### संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. लोकसंख्या विषयक धोरणाचा नेसर्गिक घटकावरील होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

२. अभ्यास क्षेत्रातील कुटुंब नियोजन नियोजनाचा अभ्यास करणे.

३. कुटुंब नियोजनाचा लातूर जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक विकासावरील परिणामाचा अभ्यास करणे.

### माहिती स्रोत

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी माहिती मिळवण्यासाठी प्राथमिक व दुय्यम  स्वरूपातील माहीति स्रोताच्या उपयोग केला जाणार आहे. प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी सर्वेक्षण मुलाखत व प्राश्नावली. चा उपयोग करण्यात आला आहे. लातूर जिल्ह्यातील मुख्य चिकित्सा अधिकारी, उप मुख्य चिकित्सा अधिकारी, मेडिकल ऑफिसर अशा कुटुंब नियोजन संदर्भातील अधिकारी याच्या मुलाखती घेऊन प्राथमिक स्वरूपाची माहिती घेण्यात आली.

**कुटुंब नियोजन संरचना**

कुटुंब नियोजन कार्यक्रमाची यशस्वी अमलबजावणी करण्यासाठी भारतात प्रत्येक राज्यात, "कुटुंब. नियोजन ब्युरो" ची स्थापना करण्यात आली आहे. तसेच शहरी भागात "स्वस्थ नियोजन केंद्र" ची स्थापना केली. तर ग्रामीण भागात "प्राथमिक आरोग्य केंद्राची" स्थापना केली. वरील प्रमाणे जिल्ह्यात कुटुंब नियोजन कार्यक्रम संरचना प्रमाणे कुटुंब नियोजन कार्यक्रमाची उद्दिष्टे, ध्येय, उपलब्धी यशस्वी पणे राबविण्याचा प्रयत्न केला जातो.

**विषय विवेचन**

प्रस्तुत विषय विवेचनात कुटुंब नियोजनाचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये लातूर जिल्ह्यातील कुटुंब नियोजनाचे सर्वेक्षण करताना धानोरा या गावातील कुटूंबाचे सर्वेक्षण करण्यात आले.त्यानुसार माहितीचे विश्लेषण.

**बोळेगाव (Bolegaon)**

**प्राकृतिक स्वरूप**

लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील बोळेगाव हे गाव ५०० ते ६०० मी. उंचीच्या दरम्यान आहे. बोळेगाव या गावाची स्थान १८.१९'६८.६" उत्तर अक्षांश ते ७७.००'७१.७" पूर्व रेखांश आहे. या गावाचे क्षेत्र ५८४.३१ चौ.हेक्टर. असून घराची संख्या २२३ इतकी आहे. या गावाची कृषी प्रधान अर्थ व्यवस्था आहे. या गावात धनेगाव सिंचन प्रकल्पामुळे संपूर्ण जमीन ही ओलिताखाली आली आहे. येथील जमीन ही सुपीक व काळी कसदार आहे तर डोगर माथ्यावरील लाल मृदा आहे. मान्सून पासून पाऊस मिळतो खरीप व रब्बी पिकाची येथे पेरणी करून उत्पन्न मिळवले जाते. या गावात बागायती शेती केली जाते. हवामान ऋतूनुसार शुष्क व कोरडे असते.

**सांस्कृतिक स्वरूप**

२०११ च्या जनगणनेनुसार येथील लोकसंख्या ९१० (२०१८-१९ मध्ये लोकसंख्या १०३२ असून यात पुरुष ५४२ तर स्त्रियांची संख्या ४९० इतकी आहे.) (Censas MIDDS Code.no. :- 560932). या मध्ये ७६ टक्के लोक हे हिंदू धर्माचे आहेत तर २४ टक्के लोक हे इतर धर्माचे आहेत. आज म्हणजे २०१८-१९ सर्वेक्षणानुसार इतर धर्माची लोकसंख्या ही जवळपास ३२ टक्के पर्यंत झाली आहे. या गावाची साक्षरता सरासरी ८० टक्के दिसून येते. यात पुरुषाची साक्षरता जवळपास ९० टक्के इतकी आहे. स्त्रियांची साक्षरता प्रमाण कमी दिसून येते.

येथील प्राथमिक आरोग्य केंद्र वलांडी असून या गावात महीन्याच्या दुसऱ्या गुरुवारी लसीकरण घेतले जाते. आरोग्याच्या व इतर कुटुंब नियोजनाच्या माहीती मोहीम ही डोर टू डोर या माध्यमातून आशा कार्यकर्ता सतत करत असतात. काही अडचण निर्माण झाल्यास ते महाराष्ट्र आरोग्य विभागाचा संपर्क क्रमांक १०४ या वर संपर्क करतात.

**(बोळेगाव या गावाचा गुगल मॅप)**




**(माहीती स्तोत्र: गुगल मॅप)**

बोळेगाव या गावाची सर्वेक्षणातून जी परिस्थिती समोर आली त्या नुसार गावातील ७० कुटूंबाचे प्रश्नावलीच्या माध्यमातून सर्वेक्षण केले त्या मध्ये ४० कुटुंब हिंदू धर्माचे, ०५ कुटुंब मुस्लीम धर्माचे (या गावात एकूण कुटुंब संख्येच्या फक्त ०८ कुटुंब हे मुस्लीम धर्माचे आहेत या पैकी आपण ०५ कुटूंबाचे सर्वेक्षण घेत आहोत.) २५ कुटुंब नवं बौध्द व बौध्द धर्माचे आचरण करणारे आहेत. एकूण कुटुंब संख्येच्या जवळपास ३३ टक्के कुटूंबाचे या दरम्यान सर्वेक्षण घेण्यात आले आहे.

**कुटूंबाचे प्रश्नावली च्या माध्यमातून सर्वेक्षण (टक्केवारी)**

| अ.क्र. | कुटूंबाचा धर्म | कुटूंबाची संख्या | कुटुंब नियोजनाचा वापर करणारे कुटुंब | | गर्भ निरोधकांचा वापर करणारे कुटुंब | | नसबंदी केलेले कुटुंब | | नसबंदी करण्याचा विचार करणारे कुटुंब | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| १ | हिंदू | ४० | ३० | ७५ | २२ | ५५ | २० | ५० | १८ | ४५ |
| २ | मुस्लीम | ०५ | ०१ | २० | ०४ | ८० | ०१ | २० | ०० | ०० |
| ३ | बौध्द | २५ | १० | ४० | २० | ८० | ०५ | २० | २० | ८० |

**(माहीती स्तोत्र: सर्वेक्षणाच्या माध्यमातून) (सारणी क्र. १)**




**(आलेख क्र. १)**

लातूर जिल्ह्यातील बोळेगाव या गावाचे सर्वेक्षण केल्यावरून हिंदू धर्मातील ज्या ४० कुटूंबाचे सर्वेक्षण केले त्यामध्ये ३० कुटुंब हे कुटुंब नियोजनाचा वापर करणारे दिसून येतात तर २२ कुटुंब हे गर्भ निरोधकांचा यात ( निरोध, गर्भ निरोध गोळ्या, तांबी, फेस येणाऱ्या गोळ्या, काही नैसर्गिक पद्धत, काही आत्मसंयम.इत्यादी.) वापर करणारे दिसून आले. आणि २० कुटुंब हे नसबंदी केलेले व १८ कुटुंब हे नसबंदीचा विचार करणारे आहेत. तर मुस्लीम धर्माचे ०५ कुटूंबाचे सर्वेक्षण केले यात ०१ कुटुंब हे कुटुंब नियोजनाचा वापर करणारे दिसून येतात तर ०४ कुटुंब हे गर्भ निरोधकांचा यात (निरोध, गर्भ निरोध गोळ्या, तांबी, फेस येणाऱ्या गोळ्या, काही नैसर्गिक पद्धत, काही आत्मसंयम. इत्यादी.) वापर करणारे दिसून आले. आणि ०१ कुटुंब हे नसबंदी केलेले व एकही कुटुंब नसबंदीचा विचार करत नाहीत. आणि बौध्द धर्माचे २५ कुटूंबाचे

सर्वेक्षण केले यात १० कुटुंब हे कुटुंब नियोजनाचा वापर करणारे दिसून येतात तर २० कुटुंब हे गर्भ निरोधकांचा यात (निरोध, गर्भ निरोध गोळया, तांबी, फेस येणाऱ्या गोळया, काही नैसर्गिक पद्धत, काही आत्मसंयम.इत्यादी.) वापर करणारे दिसून आले. आणि ०५ कुटुंब हे नसबंदी केलेले व २० कुटुंब हे नसबंदीचा विचार करणारे आहेत.


यावरूनच तीनही धर्माचा विचार व यावरून बोळेगाव गावाची लोकसंख्या विचारात घेतल्यास अलीकडील काळात हिंदू व बौध्द धर्माची आणि मुस्लीम धर्माची संख्या मध्यम गतीने वाढ झालेली दिसून येते.

**कुटुंब नियोजनामुळे आर्थिक स्तर (टक्केवारी)**

| अ.क्र. | कुटूंबाचा धर्म | कुटूंबाची संख्या | कुटुंब नियोजनामुळे उच्च आर्थिक स्तर असणारे कुटुंब | | कुटुंब नियोजनामुळे मध्यम आर्थिक स्तर असणारे कुटुंब | | कुटुंब नियोजनामुळे सामान्य आर्थिक स्तर असणारे कुटुंब | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| १ | हिंदू | ४० | ०५ | १२.५ | ११ | २७.५ | २४ | ६० |
| २ | मुस्लीम | ०५ | ०० | ०० | ०१ | २० | ०४ | ८० |
| ३ | बौध्द | २५ | ०१ | ०४ | ०८ | ३२ | १६ | ६४ |

**(माहीती स्तोत्र: सर्वेक्षणाच्या माध्यमातून) (सारणी क्र. २)**

सर्वेक्षण केलेल्या कुटूंबाचे आर्थिक स्तर वरून विवेचन केल्यास हिंदू धर्माचा ४० कुटुंब पैकी ०५ कुटूंबाची आर्थिक स्तर उच्च दिसून येतो. ११ कुटूंबाचा आर्थिक स्तर मध्यम दिसून येतो. तर २४ कुटूंबाचा आर्थिक स्तर सामान्य दिसून येतो. तसेच मुस्लीम धर्माच्या आर्थिक स्तराचे विवेचन ०५ कुटुंब पैकी एकही कुटूंबाची आर्थिक स्तर उच्च दिसून येत नाही. ०१ कुटूंबाचा आर्थिक स्तर मध्यम दिसून येतो.




**(आलेख क्र. २)**


तर ०४ कुटूंबाचा आर्थिक स्तर सामान्य दिसून येतो. आणि बौध्द धर्माचे आर्थिक स्तराचे विवेचन २५ कुटुंब पैकी ०१ कुटूंबाची आर्थिक स्तर उच्च दिसून येतो. ०८ कुटूंबाचा आर्थिक स्तर मध्यम दिसून येतो. तर १६ कुटूंबाचा आर्थिक

स्तर सामान्य दिसून येतो. यावरूनच असे दिसून येते कि ज्या धर्मात कुटुंब नियोजनांचे योग्य नियोजन करण्यात आले आहे. त्या कुटूंबाचे आर्थिक स्तर वाढलेला दिसून येतो.

**कुटुंब नियोजनामुळे सामाजिक स्तर (टक्केवारी)**

| अ.क्र. | कुटूंबाचा धर्म | कुटूंबाची संख्या | कुटुंब नियोजनामुळे उच्च सामाजिक स्तर असणारे कुटुंब | | कुटुंब नियोजनामुळे मध्यम सामाजिक स्तर असणारे कुटुंब | | कुटुंब नियोजनामुळे सामान्य सामाजिक स्तर असणारे कुटुंब | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| १ | हिंदू | ४० | ०९ | २२.५ | १४ | ३५ | १७ | ४२.५ |
| २ | मुस्लीम | ०५ | ०१ | २० | ०२ | ४० | ०२ | ४० |
| ३ | बौध्द | २५ | ०२ | ०८ | ०५ | २० | १८ | ७२ |

**(माहीती स्तोत्र: सर्वेक्षणाच्या माध्यमातून) (सारणी क्र. ३)**




**(आलेख क्र. ३)**

सर्वेक्षण केलेल्या कुटूंबाचे सामाजिक स्तर वरून विवेचन केल्यास हिंदू धर्माचा ४० कुटुंब पैकी ०९ कुटूंबाची सामाजिक स्तर उच्च दिसून येतो. १४ कुटूंबाचा सामाजिक स्तर मध्यम दिसून येतो. तर १७ कुटूंबाचा सामाजिक स्तर सामान्य दिसून येतो. तसेच मुस्लीम धर्माच्या सामाजिक स्तराचे विवेचन ०५ कुटुंब पैकी ०१ कुटूंबाची सामाजिक स्तर उच्च दिसून येतो. ०२ कुटूंबाचा सामाजिक स्तर मध्यम दिसून येतो. तर ०२ कुटूंबाचा सामाजिक स्तर सामान्य दिसून येतो. आणि बौध्द धर्माचे सामाजिक स्तराचे विवेचन २५ कुटुंब पैकी ०२ कुटूंबाची सामाजिक स्तर उच्च दिसून येतो. ०५ कुटूंबाचा सामाजिक स्तर मध्यम दिसून येतो. तर १८ कुटूंबाचा सामाजिक स्तर सामान्य दिसून येतो. यावरूनच असे दिसून येते कि ज्या धर्मात कुटुंब नियोजनांचे योग्य नियोजन करण्यात आले आहे. त्या कुटूंबाचे सामाजिक स्तर वाढलेला दिसून येतो.

बोळेगाव या गावाची सर्वेक्षण अंतर्गत असे दिसून आले की ज्या कुटूंबाची संख्या कमी अशा कुटूंबाची आर्थिक व सामाजिक सधनता दिसून येते. या गावात मुस्लीम धर्मीय संख्या नाही. पण काही हिंदू व बौध्द धर्मीय लोक ज्याची कुटुंब

सदस्य संख्या जास्त म्हणजेच कुटुंब नियोजनाचा वापर कमी किंवा करण्यास वेळ घेतल्या मुळे सदस्य संख्या जास्त आणि कुटूंबाचे आर्थिक नियोजन कोलमोडले यातूनच सामाजिक नियोजन सुद्धा कमी झाले. याचाच परिणाम म्हणजे लोकसंख्या वाढ परिणामी भौगोलिक परिस्थितीवर विपरीत परिणाम झालेला दिसून येतो.

**निष्कर्ष**

१. लातूर जिल्ह्यातील बोळेगाव या गावाची सर्वेक्षित कुटूंबाचे आकलन केल्यास ज्या कुटूंबाने कुटुंब नियोजन केले आहे त्याचे आर्थिक व सामाजिक स्तर सुधारलेला दिसून येतो.

२. "कुटुंब लहान सुख महान" या म्हणी नुसार कुटूंबाची संख्या हि त्याच्या प्रत्येक घटकावर परिणाम करते.

३. सर्वेक्षित कुटूंबाचे आकलन केल्यास गावातील लोकसंख्या वाढीचे आकलन होते.

४. लातूर जिल्ह्यातील बोळेगाव या गावाची सर्वेक्षित कुटूंबाचे आकलन केल्यास कोणत्या घटकावर अधिक भर देण्याची गरज आहे याचे आकलन होते.

५. यावरून वाढत्या लोकसंख्येचा प्राकृतिक घटकावरील परिणाम लक्षात येतो.

**संदर्भ सूची**

१. लोकसंख्या भूगोल (डॉ. शेटे, डॉ. शहापूरकर, डॉ. सुरेश फुले)

२. लोकसंख्या भूगोल (डॉ. घारपुरे विठ्ठल)

३. Population Geography (ए. बी. सवंदी)

४. जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन (२०११ ते २०१९).

५. परिवारनियोजन भूगोल (डॉ.दिनेश मोहन).

६. www.google.com

७. www.larujilhgov.com

८. www.environmental.science.com

९. जिल्हा आरोग्य पत्रिका (२०११ ते २०१९).